# मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्प

## विभागीय कृषि सह संचालक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

रामायणा कल्चरल हॉल, ओंकारेश्वर चौक, उल्कानगरी, छत्रपती संभाजीनगर - ४३१००१

ई मेल: aurangabad.riu.smart@gmail.com दुरध्वनी क्रमांक: ०२४०-२३३१०९४


जाक्र/स्मार्ट/सआसं/प्रो-कॉन/ ४१ /२०२५. दिनांक: ११/०४/२०२५.

प्रति,

मा.प्रमुख, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष - कृषि, स्मार्ट प्रकल्प तथा
संचालक (आत्मा), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**विषय: मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत प्रो-कॉन ॲग्रो प्रोड्युसर कंपनी लि., भाटवडगाव, ता.माजलगाव, जि.बीड या समुदाय आधारित संस्थेच्या चतुर्थ धावते देयकातील त्रुटींबाबत.**

संदर्भ: १) नोडल अधिकारी, जिल्हा अंमलबजावणी कक्ष, स्मार्ट प्रकल्प, बीड यांचे पत्र क्र.२३२ दि.०७/०४/२०२५.
२) या कार्यालयाचे पत्र क्र.२९ दि.०७/०४/२०२५.
३) वैयक्तिक सल्लागार (स्थापत्य अभियंता), विभागीय अंमलबजावणी कक्ष, स्मार्ट प्रकल्प, प्रस्तुत कार्यालय यांचा क्षेत्रीय भेटीचा तपासणी अहवाल दि.०९/०४/२०२५.

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत प्रो-कॉन ॲग्रो प्रोड्युसर कंपनी लि., भाटवडगाव, ता.माजलगाव, जि.बीड यांच्या Construction of Warehouse ७५० MT व Construction of Dal Mill Shed ४३८.९६ Sq. Mtr. या घटकांच्या चालू बांधकामाचे चतुर्थ धावते देयक तपासणीसाठी संदर्भ क्र.१ अन्वये या कार्यालयास प्राप्त झाले होते.

त्यानुसार या कार्यालयाने जिल्हा अंमलबजावणी कक्ष, स्मार्ट प्रकल्प, बीड येथील नोडल अधिकारी व प्रस्तुत कार्यालयातील वैयक्तिक सल्लागार (स्थापत्य अभियंता) यांना सदरील समुदाय आधारित संस्थेस प्रत्यक्ष भेट देवून या कार्यालयास प्राप्त चतुर्थ देयकासोबत सादर केलेल्या मापनपुस्तिकेतील नोंदी व प्रत्यक्ष झालेले काम याची संयुक्त तपासणी करणेबाबत संदर्भ क्र.२ अन्वये कळविले होते.

त्यानुसार वैयक्तिक सल्लागार (स्थापत्य अभियंता) यांनी व जिल्हा अंमलबजावणी कक्ष, स्मार्ट प्रकल्प, बीड येथील नोडल अधिकारी यांनी दि.०८/०४/२०२५ रोजी प्रकल्प स्थळी भेट देवून संयुक्त तपासणी केली. त्यानुसार संदर्भ क्र.३ अन्वये वैयक्तिक सल्लागार (स्थापत्य अभियंता), विभागीय अंमलबजावणी कक्ष, स्मार्ट प्रकल्प, प्रस्तुत कार्यालय यांनी तपासणी अहवाल या कार्यालयास सादर केला असता त्यामध्ये **"चौथे धावते देयक रक्कम रु.२९,७०,४३७/- या रकमेचे देयक सादर केलेले आहे. बांधकाम स्थळी प्रत्यक्ष भेटी दरम्यान चौथ्या धावत्या देयकाची मोजमाप पुस्तिका तपासणी केली असता त्यामध्ये electrical च्या नोंदी घेण्यात आलेल्या आहे. परंतु बांधकाम स्थळी प्रत्यक्ष electrical कामाचे कुठलेही आयटमचे काम केल्याचे दिसून आले नाही. सदर electrical item ची एकुण किंमत रक्कम रु.२४,०५,९५०/- इतकी नोंदवण्यात आलेली आहे"** असा अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे.

करिता माहितीस्तव सविनय सादर.

११/०४/२०२५

**(माधुरी सोनवणे)**
**नोडल अधिकारी**
**विभागीय अंमलबजावणी कक्ष, स्मार्ट प्रकल्प**
**विभागीय कृषि सह संचालक कार्यालय**
**छत्रपती संभाजीनगर**

SMART RIU Chhatrapati Sambhajinagar

मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्प
विभागीय कृषि सह संचालक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
रामायणा कल्चरल हॉल, ओंकारेश्वर चौक, उल्कानगरी, छत्रपती संभाजीनगर - ४३१००१
ई मेल: aurangabad.riu.smart@gmail.com दुरध्वनी क्रमांक: ०२४०-२३३१०९४

प्रत,

मा.प्रकल्प संचालक, प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष, स्मार्ट प्रकल्प, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.

11/04/2025.

**(माधुरी सोनवणे)**
**नोडल अधिकारी**
**विभागीय अंमलबजावणी कक्ष, स्मार्ट प्रकल्प**
**विभागीय कृषि सह संचालक कार्यालय**
**छत्रपती संभाजीनगर**

SMART RIU Chhatrapati Sambhajinagar